<u>**खटला क्र. २९८/पीडब्ल्यू/२०१५**</u> <u>**निशाणी क्र. २२**</u>

साक्षीदार क्र. १
मी शपथपुर्वक सांगतो की,

| | |
|---|---|
| माझे नाव | : रुजबे मुंडेगार आगा, |
| वय | : ७२ वर्षे, |
| व्यवसाय | : काहीनाही, |
| पत्ता | : सदनिका क्र. २, रॉक्र हाऊस, वरळी हिल रोड,मुंबई —१८. |

<u>**सरतपासणी सरकारी वकील श्री. रविंद्र पाटील यांचे तर्फे:—**</u>

१. माझी बख्तावर (इराणी) नावाची गोखले रोड (दक्षिण) व सयानी रोड याच्या मध्यभागी असलेल्या ठिकाणी बिल्डींग आहे. त्या बिल्डींगमध्ये भाडेकरु राहतात. सदरील इमारत हि तळमजला व त्यावर दोन मजले अशी रचना असलेली आहे. सदरील इमारतीच्या पहिल्या मजल्यावर रुम नंबर १४ मध्ये सखाराम आंटा हा भाडेकरु राहत होते. सदरील रुमची भाडे पावती ही सखाराम आंटा यांच्या नावे देण्यात येत असे. आमच्या बिल्डींगमधील भाडेवसूली साठी रेन्ट कलेक्टर याची नेमणून होती. माझ्या वडिलांच्या काळामध्ये मापल सिंग हा रेन्ट कलेक्टर म्हणून काम करत असे. सखाराम आंटा याच्या मृत्यू नंतर श्रीधर अप्पा मेस्त्री उर्फ श्रीधर असोलकर याने सदरील रुमचा ताबा घेतला. श्रीधर अप्पा मेस्त्री उर्फ श्रीधर असोलकर याला मी व माझ्या वडिलांपैकी कोणीही सखाराम आंटा याच्या मृत्यू नंतर त्या रुमचा ताबा दिला नव्हता अथवा आम्ही त्याला भाडेकरु म्हणून देखिल स्वीकारले नव्हते. श्रीधर अप्पा मेस्त्री उर्फ श्रीधर असोलकर याच्या पत्नीच्या मृत्यूनंतर सध्या तो एकटाच सदरील रुममध्ये राहत असे. त्याचा मृत्यू दि. २३.०५.२०११ रोजी झाला. मी प्रस्तुत प्रकरणात श्रीधर अप्पा मेस्त्री उर्फ श्रीधर असोलकर याच्या मृत्यूचा दाखला दाखल केलेला असून तो मला आता दाखवण्यात आला. सदरील मृत्यूचा दाखला मी प्राप्त करुन पोलीसांना दिलेला आहे म्हणून मला त्याबाबची माहिति आहे. सदरील मृत्यूचा दाखला हा **निशाणी क्र. २३** वर आहे.

२. श्रीधर अप्पा मेस्त्री उर्फ श्रीधर असोलकर याच्या मृत्यूनंतर सुनिल मेस्त्री व श्रध्दा मेस्त्री यांनी रुम नंबर १४ चा अनिधिकृतपणे कब्जा घेऊन टाकला. श्रीधर अप्पा मेस्त्री उर्फ श्रीधर असोलकर याच्या मृत्यूनंतर सुनिल मेस्त्री व श्रध्दा मेस्त्री यांनी साधारणपणे जून २०११ या महिन्यात श्रीधर अप्पा मेस्त्री उर्फ श्रीधर असोलकर याची बनावट स्वाक्षरी करुन महसूल अधिकारी यांच्याकडे रेशन कार्ड मध्ये कुंटुंबातील सदस्य म्हणून नाव नोंदणीसाठी अर्ज दाखल केला व तो अर्ज हा श्रीधर अप्पा मेस्त्री उर्फ श्रीधर असोलकर यांनीच दाखल केलेला आहे असे महसूल अधिकारी यांना भासवून त्यांची फसवणूक केली.

३. मला वरील फसवणूकीची माहिती समजल्यानंतर मी संबंधित कार्यालयामध्ये जाऊन त्याबाबतची कागदपत्रे तपासली असता आरोपींची नावे हि श्रीधर अप्पा मेस्त्री उर्फ श्रीधर असोलकर यांच्या रेशन कार्डमध्ये नोंदवली असल्याचे समजले. मला आता दि. २४.०६.२०११ चा अर्जदार म्हणून श्रीधर अप्पा मेस्त्री उर्फ श्रीधर असोलकर यांच्या नावे देण्यात आलेला अर्ज दाखवण्यात आला. मी अपिलीय अधिकारी यांच्याकडे अर्ज देऊन दि. २४.०६.२०११ च्या अर्जाची प्रत प्राप्त केली होती. दि. २७.०९.२०११ रोजी अपिलीय अधिकारी यांनी मला पाठवलेल्या पत्रासोबत दि. २४.०६.२०११ च्या अर्जाची छायांकित प्रत पाठवली होती. त्यामुळे मला त्याबाबतची माहिती आहे. तपासा दरम्यान पोलीसांनी मूळ अर्ज देखिल प्राप्त केलेला असून तो प्रस्तुत प्रकरणामध्ये दाखल आहे. (सहा. सरकारी अभियोक्ता यांनी दि. २४.०६.२०११ रोजीच्या छायांकित प्रतीस निशाणी देण्याबाबत विनंती केली. सदरील अर्जाची मूळ प्रत तपासी अधिकारी यांनी प्राप्त केलेली असून तो दस्त प्रस्तुत प्रकरणात दाखल करण्यात आलेला आहे. त्यामुळे ओळखीसाठी सदरील दस्तास निशाणी देण्यास कोणतीही कायदेशीर अडकाठी नाही. त्यामुळे सदरील दस्तास ओळखीसाठी **निशाणी क्र. २४** देण्यात येते.)

४. मला माहितीच्या अधिकाराखाली वरील कागदोपत्री पुरावा प्राप्त झाल्यानंतर मी आरोपींविरुध्द पोलीस स्टेशनला तक्रारी अर्ज दाखल केला. मला

आता दि. १६.०८.२०१३ रोजीचा तक्रारी अर्ज दाखवण्यात आला. त्यावर माझी स्वाक्षरी नमूद असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तो तक्रारी अर्ज **निशाणी क्र. २५** वर आहे. त्यानंतर दि. २६.०९.२०१३ रोजी माझा फिर्यादी जबाब नोंदवून घेतला. मला आता माझा फिर्यादी जबाब दाखवण्यात आला. त्यावर माझी स्वाक्षरी नमूद आहे. त्यातील मजकूर मी वाचून पाहिला. तो मजकूर खरा व बरोबर आहे. फिर्यादी जबाब हा **निशाणी क्र. २६** वर आहे. मला आता प्रथम खबरी अहवाल दाखवण्यात आला. त्यावर माझी स्वाक्षरी नमूद आहे. त्यातील मजकूर मी वाचून पाहिला. तो मजकूर खरा व बरोबर आहे. प्रथम खबरी अहवाल हा **निशाणी क्र. २७** वर आहे. मी दोन्ही आरोपींना ओळखतो ते आज न्यायालयात हजर आहे.

उलटतपास आरोपीकरीता ॲड. प्रसाद पांचाळ यांचेतर्फे :—

**( ॲड. साईश पाटकर यांनी असे प्रतिपादन केले की, ॲड. प्रसाद पांचाळ हे त्यांच्या मानीनीय उच्च न्यायालयातील कामात व्यस्त असल्यामुळे उलट तपास तहकूब करावा. निशाणी क्र. २८ वर दाखल केलेला अर्ज मंजूर झाल्याने उलटतपास दि. २९.११.२०२५ पर्यंत तहकूब.)**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

स्वाक्षरी/—
**(वैभव व. कुलकर्णी)**
**अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,**
**५ वे न्यायालय, दादर, मुंबई.**

**दिनांक : १२/११/२०२५.**